क्र.का.१२/परतावा/प्र.क्र.८०५/३३१९-३३६९
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक :- ११/१२/९१.

**प रि प त्र क :-**

**विषय :-** **मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८**
**महाराष्ट्र अधिनियम क्र. नऊ १९९० अन्वये केलेल्या सुधारणे प्रमाणे जास्त भरलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा मंजूर करण्याची कार्यपध्दती..**

भाडेपट्टयाच्या दस्तावर ज्यादा भरलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा.

सर्व सह जिल्हा निबंधक यांना कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र अधिनियम क्र. ९/१९९० अन्वये मुंबई मुद्रांक कायदयातील अनुसूची १ मधील अनुच्छेद २५(ड) मध्ये दिनांक १७.३.१९८८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने मुद्रांक शुल्काचे सवलतीचे दर विहीत केलेले आहेत. त्यामुळे शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. मुद्रांक १०९०/ प्र.क्र. ३४५/म.१ दिनांक २६.६.१९९० अन्वये परतावा देण्यांत येत आहे.

अनुच्छेद २५(ड) मधील सवलतीचे दर हे अनुसूची एक मधील इतर समांतर अशा अनुच्छेद ३२, ३३, ३४, ३६ इत्यादी लेख्यांना सुध्दा (Instrument) लागू आहेत. त्यामुळे हया दस्तांवर देखिल सवलतीच्या दराऐवजी जास्ती मुद्रांक शुल्क वसूल केले असल्यास ते संबंधितांना परत करावे लागतील. सबब शासनाने असा निर्णय घेतला आहे की, शासन परिपत्रक दिनांक २६.६.१९९० मध्ये दिलेल्या विहीत कार्यपध्दतीनुसार भाडेपट्टयाच्या दस्तावरील जास्तीच्या दिलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा मंजूर करण्यांत यावा. ही प्रकरणे केवळ दि. १७.३.१९८८ ते दिनांक ७.२.१९९० या कालावधीसाठीच मर्यादित राहातील याची नोंद घेण्यात यावी.

सही/-
(क.आ. सातदिवे)
उप नोंदणी महानिरीक्षक, म.रा.
पुणे.

प्रत :-
सर्व सह जिल्हा निबंधक यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यासन अधिकारी नों.म.नि.का. पुणे

**अति तात्काळ**